**Newspaper:** **Maharashtra Times**

**Date:** **20th August, 2019**

**Article regarding Podar Nature Club**



# फक्त पोस्ट नव्हे, कंपोस्ट

## पोदारचं पर्यावरणस्नेही पाऊल

पर्यावरणाची काळजी घेण्याबाबत सोशल मीडियावर खूप काही पोस्ट केलं जातं, चर्चा होते. प्रत्यक्षात त्यावर काम करणारे मात्र कमीच. पोदार कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मात्र स्वत: पुढाकार घेत कचरा व्यवस्थापनासाठी पावलं टाकली आहेत. कॉलेजमध्येच कचऱ्यापासून कंपोस्ट खताची निर्मिती केली जातेय. जाणून घेऊ त्याविषयी...



मधुरा वालावलकर, गरवारे इन्स्टिट्यूट

कचऱ्याची विल्हेवाट लावणं ही मुंबईसह अनेक शहरांसाठी गंभीर समस्या झाली आहे. पर्यावरणरक्षणाच्या दृष्टिनं कचऱ्याचं योग्य प्रकारे व्यवस्थापन करणं गरजेचं झालंय. पोदार कॉलेजनं त्यासाठीच काही पावलं उचलत इतर कॉलेजांपुढे आदर्श निर्माण केला आहे.

कचरा व्यवस्थापन करताना ओला आणि सुका कचरा याचं वर्गीकरण महत्त्वाचं ठरतं. पालिकेकडून हे वारंवार सांगितलं जात असलं, तरी नागरिक त्याकडे गांभीर्यानं पाहत नाहीत. पोदारच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या कॅम्पसमध्येच कंपोस्ट खड्ड्याची निर्मिती केली आहे. कँटिनमधला ओला कचरा, उरलेला भाजीपाला, आवारात पडलेली झाडांची सुकी पानं यावरोबरच माटुंगा भाजी मार्केटमधला ओला कचरा या सगळ्या कचऱ्याचं व्यवस्थापन या कंपोस्ट खड्ड्यामार्फत केलं जात आहे. भाजी मार्केटमधला ओला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात पोदार कॉलेजच्या उपक्रमाचा मोठा हातभार लागला आहे. आठवड्यातून दोन-तीन वेळा कचरा गोळा केली जातो. यासाठी एक चमू तयार करण्यात आला असून, त्यातील सदस्यांच्या नियमित देखरेखीखाली हे काम होतं. पुरेसा कचरा गोळा झाल्यावर ३ ते ६ महिन्यांच्या काळात नैसर्गिकरित्या हा कचरा विघटीत होतो. यातून निर्माण होणारं खत हे चहा पावडरसारखं दिसतं. हे खत कॉलेज कॅम्पसमध्ये आणि इतरत्र वापरासाठी देण्यात येणार आहे.



### कागद कार्यशाळा

नेचर क्लबच्या प्रा. कपिलदेव इंदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली चमूनं काही प्रमाणात सेंद्रिय खताचं उत्पादन केलेलं आहे. याशिवाय इ-कचरा व्यवस्थापन, टेट्रा पॅक व्यवस्थापन या गोष्टीही कॉलेजमध्येच राबवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासोबतच खारफुटी जतनासाठी जनजागृती, वाया जाणाऱ्या कागदाचा पुनर्वापर करण्यासाठी हस्तनिर्मित कागद बनवण्याची कार्यशाळा असे इतर अनेक उपक्रमही राबवण्यात येत आहेत.

> आम्ही नेहमीच पर्यावरणपूरक कार्यक्रमांना पाठिंबा देत असतो. हे उपक्रम राबवताना, त्यामागचा मूळ उद्देश पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावा, त्यांना निसर्गसंवर्धनाचं महत्त्व समजावं हा विचार यामागे आहे. मुलांनी स्वतःहून या सगळ्या उपक्रमांसाठी पुढाकार घेतला हे कौतुकास्पद आहे. सर्व जबाबदाऱ्या विद्यार्थीच सांभाळत असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठीही हे पूरक आहे. सर्व उपक्रम शेवटपर्यंत व्यवस्थित पार पाडले जावेत यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> -डॉ. शोभना वसुदेवन, प्रिन्सिपल

